# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Children in distress Situation**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **13/10/2020**

**Brief of the work done :-**

कारंजा - पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे 'त्या' अल्पवयीन मुलाला मिळाले जीवनदान.

पुण्य नगरी

## पोलिसांच्या सर्तकतेने अल्पवयीन मुलास मिळाले जीवनदान!

कारंजा, दि. १२ (प्रतिनिधी)



सहायक पोलीस निरीक्षक नम्रता राठोड यांच्या सर्तकतेमुळे एका अल्पवयीन मुलास जीवनादान मिळाले आहे. जखमी अवस्थेत पडून असलेल्या या मुलावर उपचार करुन सध्या ताला बालआश्रमात ठेवण्यात आले आहे.

कारंजा ते मुर्तिजापूर मार्गावरील जुडवा हनुमान मंदिराजवळ रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत एक निराधार अल्पवयीन मुलगा पडला असल्याचे ९ऑक्टोंबर रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान कारंजा शहर पोस्टेच्या सहायक पोलीस निरीक्षक नम्रता राठोड यांच्या निदर्शनास आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता रूग्णवाहिकेची मदत घेतली व उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. त्या जखमी मुलावर वैद्यकिय अधिकारी डॉ. एन. आर. साळुंखे यांनी उपचार केले. सदर घटनेची माहिती जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी सुभाष राठोड यांना देण्यात आली. त्यानुसार सदर मुलाची पाहणी करण्याकरीता महिला संरक्षण अधिकारी रूपेश सुरजुसे कारंजात दाखल झाले व त्यांनी सर्वधर्म आपत्कालीन संस्थेचे अध्यक्ष शाम सवाई यांच्या समवेत त्या मुलाच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु या मुलाचे पालक, नातेवाईक यांचा शोध लागला नाही. अखेर ११ ऑक्टोंबर रोजी त्याला वाशिम जिल्हा बालन्याय समितीच्या स्वाधिन करण्यात आले. यावेळी समिती सदस्य अविनाश मुधोळकर यांनी या मुलास महिला बालकल्याण समितीद्वारे बाल आश्रमात ठेवण्यात येणार असल्याची माहिती दिली. एका निराधार अल्पवयीन मुलाला जिवदान देण्यासाठी व त्याच्या भविष्याची व्यवस्था करण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक नम्रता राठोड, पोलीस कर्मचारी अमोल येवले, शाम सवाई , सागर घोगलीया, शंकर रामटेके, अमोल गोढवे, बंडु चतूरकर, सुरक्षा रक्षक तरुण सिरसाट, सातिष घोगलीया व अहेमद पठाण यांनी मानवतेचा परिचय दिला.